22 NOV 2021

प्रति,

मा. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

विषय:— सन २०१९—२० मधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयाचे बॅक खाते तांत्रिक कारणामुळे बंद असल्याने महाडीबीटीकडे परत गेलेबाबत.

महोदय,

आमच्या महाविद्यालयाचे बॅक खाते दिनांक १०/०३/२०२१ ते दिनांक १७/०३/२०२१ या कालावधीमध्ये तांत्रिक कारणामुळे बंद होते. त्यामुळे सदर कालावधीमध्ये महाडीबीटीमहाआयटी कडून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठीची रक्कम महाविद्यालयाच्या बॅक खातेमध्ये जमा करणेसाठी दिलेली होती परंतु महाविद्यालयाचे बॅक खाते बंद असल्यामुळे प्रत्यक्षात सदरची रक्कम महाविद्यालयाच्या बॅक खातेमध्ये जमा झालेली नाही. परंतु महाडीबीटीमहाआयटी लॉगीनमध्ये (महाविद्यालय व विद्यार्थी ) सदरची रक्कम Fund Disbursed अशी दिसत आहे .याबाबत बॅककडे चौकशी केली असता त्यांनी सदरची बॅक खात्यामध्ये जमा न होता रक्कम परत गेल्याचे सांगितले.

सदर प्रकाराबाबत आम्ही प्राचार्य लॉगीनमधून Grivence केलेला होता. त्यानंतर त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. परंतु अद्याप सदर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या बॅक खात्यामध्ये प्रत्यक्षात जमा झालेली नाही.

तरी याबाबत मागदर्शन होवून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मिळावी ही विनंती.

Sakharale 415 414

संचालिका

सोबत:—

१. Grivence
२. Bank Statement
३. Student list